अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 27 नोव्हेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 15 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ३३,७७९ मतदार निवडणार नगराध्यक्ष व २३ नगरसेवक

## येत्या मंगळवारला मतदान, ०३ डिसेंबरला मतमोजणी


**योगेश मिसार**
**(काँग्रेस)**


**सुयोग बाळबुध्दे**
**(भाजप)**


**मिलिंद भनारे**
**(शिवसेना उबाठा)**


**निहाल ढोरे**
**(बसपा)**

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर पालिकेवर नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांना निवडून देण्यासाठी ०२ डिसेंबर २०२५ ला मतदान होणार आहे. यामध्ये एकूण ३३७७९ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ३६ मतदान केंद्रावर ब्रम्हपुरीतील नागरीक आपला मताधिकाराचा हक्क बजावणार आहेत. यात काँग्रेस, भाजपा, तिसरी आघाडीसह अपक्ष उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात असून प्रचारास सुरूवात झाली आहे.

ब्रह्मपुरी नगरपालिकेवर गेल्या एक वर्षापासून प्रशासक राज होते. ब्रम्हपुरी नगरपालिकेचे आरक्षण सोडत निघाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला. ब्रम्हपुरी नगर पालिकेत नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गाकरीता राखीव असल्याने राजकीय पक्षातील अनेक प्रतिष्ठित मातब्बर उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी उभे आहेत. ब्रम्हपुरीच्या गुलाबी थंडीत निवडणूकीचा ज्वर चांगलाच वाढत आहे. ब्रम्हपुरी नगर परिषदेसाठी जनतेतून थेट नगराध्यक्ष व ११ प्रभागासाठी २३ नगरसेवक निवडून देण्यासाठी ०२ डिसेंबरला मतदान होणार आहे. यात नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांना निवडून देण्यासाठी १६४३१ पुरूष तर १७३४८ महिला आपला मताधिकाराचा हक्क बजावणार आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेस पक्षाकडून योगेश मिसार, भाजपाकडून सुयोग बाळबुद्धे, शिवसेना (उबाठा) कडून मिलींद भणारे, तर बसपा कडून निहाल ढोरे निवडणूकीच्या आख्याड्यात उभे आहेत. नगराध्यक्ष पदासाठी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# साहेब, दोन वेळच्या अन्नाचे लाले पडताहेत.. कसं जगायचं तुम्हीच सांगा...

## रस्त्याचा विकासकाम ठरतोय त्यांना जगण्यासाठी अडसर

ब्रम्हपुरी / महेश पिलारे



गेल्या चार महिन्यांपासून रस्त्याचे काम चालू आहे. काम सुरू असल्यामुळे रस्त्यावरची धूळ सतत दुकानातील सामानावर साचत असते. रोजा दिवसाभर सामानावरची धूळ साफ करावी लागते. रस्त्याचा काम सुरू असल्यामुळे ग्राहक संख्या कमी झाली आहे. कधी धंदा होते, तर कधी काहीच धंदा होत नाही. धंद्याच्या भारोश्यावर घर चालते. पैसे आल्यावरच घरात चूल पेटते, अन्यथा आसवांचा हुंदका गिळून झोपावे लागते. ''साहेब, दोन वेळच्या खायचे लाले पडताहेत हो... आता तुम्हीचं सांगा, आम्ही जगायचं कसं?'', असा सवाल करीत तो पाणावलेल्या डोळ्यांनी आपली करुण कहाणी सांगत होता. ही व्यथा आहे, भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी स्वाभिमानाने धडपड करणाऱ्या मोहम्मद शेख यांची... व त्यांच्यासारख्या फुटपाथवर सामान विक्रेत्यांची...

ब्रह्मपुरी शहरातील विद्यानगर वॉर्ड येथील रहिवासी मोहम्मद हमीद शेख. वय वर्षे ५६. त्यांचे ब्रम्हपुरी - वडसा महामार्गावरील बारई तलाव लगत फुटपाथवर चष्मे व गॉगल विकण्याचा दुकान आहे. दुकानातील धंद्याच्या भारोश्यावर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. हातावर आणणे आणि पानावर खाणे हा त्यांचा नित्यक्रम. परंतु गेल्या अनेक महिन्यापासून ब्रह्मपुरी-वडसा राष्ट्रीय महामार्गाचे विकासकाम सुरू असल्यामुळे, हा राष्ट्रीय महामार्ग त्या कुटुंबाच्या जगण्यासाठी अडसर ठरला आहे.

मोहम्मद शेख यांचे एक पत्नी, दोन मुली व एक मुलगा असं कुटुंब आहे. त्यांच्या दोन्ही मुली

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# बहुआयामी व्यक्तिमत्त्व ॲड. गोविंद भेंडारकर अनंतात विलिन

ब्रह्मपुरी/का.प्र.



चंद्रपूर जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष, प्रसिद्ध विधिज्ञ, अखिल भारतीय काँग्रेस ओबीसी विभागातील पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ब्रह्मपुरी विधानसभा माजी अध्यक्ष, माजी सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अशी बहुआयामी ओळख असलेले तसेच अंधश्रद्धा निर्मूलन चाळवळीतून समाजपरिवर्तनाची प्रेरणा देणारे, अनेक सामाजिक, प्रगतिशील आंदोलनांमध्ये हिरिरीने सहभागी झालेले ॲड. गोविंद बाबुराव भेंडारकर (वय ६५) यांचे दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ मंगळवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास मूत्रापिंड निकामी झाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

गोसेखुर्द धारण पूर्णत्वासाठी त्यांनी न्यायालयात तसेच रस्त्यावर उतरून प्रदीर्घ लढा दिला. कुणबी समाजातील सर्व पोट जातींना एकत्र करून

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# आता मृतदेहाची राखही असुरक्षित!

स्वत:चा फायदा व्हावा याकरिता सोने, पैसा, बकऱ्या, गाई, म्हशी आणि सर्व प्रकारचे साहित्याचे काम चोरांच्या टोळ्या करतात. पण नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथे चक्क दोन मृतदेहांची राख चोरण्याचा अफलातून प्रकार घडला. परिणामी, आता मृतदेहांची राखही असुरक्षित झाली की काय असाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसे पाहता मृतदेहांची राख अघोरी विद्या प्राप्तीसाठी केली जाते, असा समज आहे. पण प्रश्न हा पडतो की, मानवाने चंद्रासह मंगळावर जाण्याचा भीमपराक्रम केला असताना पृथ्वीतलावरील अंधश्रद्धाळू मात्र मृतदेहांची राख चोरून अघोरी विद्येसाठी का धडपडत आहेत. विशेष म्हणजे ही अघोरी विद्या प्राप्त झाल्यावर संबंधित लोक त्याचा सदुपयोग करणार नाही हे शंभर टक्के खरे आहे. ते तर त्या अघोरी विद्येचा दुरुपयोगच करतील, हे शाश्वत सत्य आहे. पण अशा अघोरी विद्येची समाजाला खरोखरच गरज आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल.

तसे पाहता विज्ञानवादी माणूस अंधश्रद्धा, अघोरी विद्येला मान्यता देतच नाही. तरीही मृतदेहांची राख चोरीला गेली हे शाश्वत सत्य नाकारून कसे चालणार आहे. विशेष म्हणजे राख चोरणाऱ्यांना त्यातून युरेनियमचा साठा मिळणार आहे का? मग तरीही त्यांनी जळत्या चितेची राख चोरण्याचे धाडस केले, खरोखरच हा गुन्हा विचित्र आणि पोलिसांकरिता आव्हान ठरला आहे. नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथे सोमवार, ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी एका युवतीचा आणि इसमाचा मृत्यू झाला. त्यांच्यावर स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार पार पडला. दुसऱ्या दिवशी सर्व आप्तस्वकीय त्यांच्या राखेतून अस्थी गोळा करायला गेले तेव्हा त्यांना तिथे काहीच दिसले नाही. त्या अन्त्यसंस्कार केलेल्या मृतदेहांची राख चोरांनी रातोरात चोरून नेली होती. पोलिसांकडे याविषयी तक्रार झाली.

पोलिसांनी तातडीने तपास यंत्रणा कामाला लावली, पण नेमकी राख कोणी नेली याचा उलगडा करता आलेला नाही. यामुळे चोरांनी प्रथमत: स्मशानभूमी आणि परिसराची रेकी केली असावी, त्यानंतर त्यांनी मृतदेहांची राख चोरून नेली. गुन्हेगार गुन्हा करताना काही तरी पुरावे मागे सोडतात असे म्हणतात. पण राख चोरणाऱ्यांनी असले पुरावे सोडलेले नाहीत. मात्र खबऱ्यांना सक्रिय केले तर नक्कीच चोरांचा उलगडा लागणे कठीण नाही. याकरिता पोलिसांसह विज्ञानवादी विचारांच्या सामान्य लोकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा अन्त्यसंस्कारानंतर रक्षा विसर्जनापासून ते दोघेही मृतक शेवटपर्यंत वंचित राहतील, हे मात्र खरे. चोरांनी तर चोरी करून यश संपादन केले, पण ज्यांच्या नातेवाईकांची राख चोरीस गेली त्या लोकांच्या भावनांचे काय ? अघोरी विद्येसाठी धडपड करणाऱ्यांनी माणुसकीच्या नात्याने का असेना आप्तस्वकीयांच्या भावनांचा विचार करायला हवा होता. पोटच्या मुलीचा अचानक मृत्यू ही घटना पचविणे कठीण आहे. त्या अवस्थेत तिची राखही चोरांनी चोरल्याने त्या आईवडिलांना काय वाटत असावे, याचाही विचार व्हायला हवा. फक्त स्वत:चा स्वार्थ पूर्ण व्हावा म्हणून चोरांनी मृतदेहांची राख चोरून एवढ्यापुरता ही घटना मर्यादित नाही. यातून सामाजिक, भावनिक, धार्मिक असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्याची उत्तरे समाजानेच शोधायला हवी.

आपल्या हातून अपराध घडला तर माणूस होतो. मग येथे राख चोरणाऱ्यांना काहीच वाटू नये याचे आश्चर्य वाटते. अघोरी विद्येत एवढीच ताकद असेल तर मग त्याचा वापर पाकिस्तानच्या विरोधात करा ना? तिथे तर भारतीय सैन्यालाच दोन हात करावे लागतात. जिवंतपणी त्या मुलीसह इसमाने यातना भोगल्या. त्यांना मेल्यावर राख विसर्जनानंतर मोक्ष प्राप्तीचाही अधिकार चोरांनी हिसकावून घेतला. हे काही चांगले घडले नाही. ही बाब खटकणारी, संताप आणणारी शिवाय लोकांच्या भावनांचा अनादर करणारीच आहे. पण राखेची चोरी नेमकी कशाकरिता केली, याचा उलगडा व्हायला हवा. जिज्ञासू आणि विज्ञानवादी लोकांची हीच भावना असून, त्याचे खरे रूप समोर आले तरच बरे होईल. समाजानेही आता मृतदेहावर अन्त्यसंस्कार केल्यानंतर आपल्या व्यक्तीच्या राखेची दुसऱ्या दिवशीपर्यंत सुरक्षा करावी. अन्यथा कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अन् भलतेच प्रश्न उद्भवतील...

# ने.हि. कन्या विद्यालयात मतदार जनजागृतीकरीता निबंध स्पर्धेचे आयोजन




ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ या विषयावर आपले मत निबंध स्पर्धेच्या माध्यमातून मांडले.

या प्रसंगी बोलताना शाळेच्या मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, मतदान हा प्रत्येक नागरिकाचा महत्त्वाचा अधिकार आहे आणि याबाबत युवा पिढीला सजग करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शब्दशक्तीचा प्रभावी वापर करून आपले विचार निबंधामधून व्यक्त करावे, असे मार्गदर्शन केले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपली मते मांडली आणि या उपक्रमामुळे शाळेत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि नागरिकत्वाची जाणीव वाढली असून, शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी या उपक्रमासाठी उत्साही असल्याचे दिसून आले.

सदर कार्यक्रम निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सतीश मासाळ व सहा निवडणुक निर्णय अधिकारी डॉ माधुरी सलामे व अतिरिक्त निवडणुक निर्णय अधिकारी लिना बोबाटे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# RW अकॅडमीच्या १० विद्यार्थ्यांची आर्मीमध्ये निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरीतील RW अकॅडमी विविध स्पर्धा परीक्षेची कोचिंग देत असते आज पर्यंत



अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात काम करीत आहे. या अकॅडमी ने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली असून याच कोचिंग सेंटर मधून बऱ्याच विद्यार्थ्यांनी इंडिया आर्मी अग्निवीर यासाठी परीक्षा दिली होती.

दिनांक २१ ला इंडियन आर्मी अग्निवीर परीक्षेचा निकाल आला. त्यामध्ये अकॅडमीने घवघवीत यश संपादन करून तब्बल १० विद्यार्थ्यांची इंडियन आर्मी अग्निवीर मध्ये निवड झाली. यात प्रसाद अजबले, तेजस बगमारे, मयूर बोरकर, गिरीश मोटघरे, साहिल मेश्राम, वैभव वसेकर, युसूफ चंडिकार, तन्मय जुवारे, शुभम, अनिकेत या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आपल्या यशाचे श्रेय अकॅडमी चे संचालक होमराज लोनबले यांना दिले आहे.

एकाच कोचिंग सेंटर मधून १० विद्यार्थ्यांची इंडियन आर्मी अग्निवीर मध्ये निवड झाल्याचा आनंद गगनात मावेसा झाला. कोचिंग सेंटरच्या सर्व विद्यार्थ्यांनी फटाक्याची आतिषबाजी ढोल वाजवून जल्लोष रॅली काढली. सर्व स्तरातून या अकॅडमी चे व गुणवंत विद्यार्थी चे अभिनंदन केले जात आहे .

## विनोदिनी

रामूच्या मृत्यूनंतर यमराजांनी त्याला शिक्षा म्हणून एका थंड घरात ठेवले जेथे तापमान -४ अंश होते. तरीही तो हसत बाहेर आला आणि म्हणाला अजून एक पंखा असता तर मजा आली असती... आता यमराजाने त्याला एका उबदार घरात ठेवले जेथे तापमान ५५ अंश होते. आणि त्यात एक पंखा देखील लावला... तेव्हाही तो माणूस हसत बाहेर आला आणि म्हणाला पंखा नसता तर बरं झालं असतं...

त्यानंतर यमराजांनी पाऊस, गारपीट, वादळ तसेच मोठ-मोठ्या खड्ड्यात आणि पाण्याने भरलेल्या डबक्यात पाठवलेवगैरे सगळे वापरले तरी त्याला काही झाले नाही.

हे सर्व पार करून हसत बाहेर आला आणि म्हणाला, 'मला माझे शहर आठवले.' त्यावरून यमराजांनी चित्रगुप्तला त्याची नोंद तपासण्यास सांगितले.

रेकॉर्ड बघून चित्रगुप्त म्हणाला.. महाराज, हा माणूस ब्रम्हपुरीचा रहिवासी आहे, त्याने सर्व यातना सहन करून स्वतःचा विकास केला आहे!! तो मरणयातना सहन करून फिरू शकतो, विशेष म्हणजे त्याच्या संवेदना मेल्या आहेत. त्याला त्याची सवय झाली आहे. त्यामुळे त्याचे काहीही नुकसान होऊ शकत नाही..!!!!

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# ब्रम्हपुरी तालुक्यातील माध्यमिक शाळेतील बोगस भरती घोटाळा उघड

## सचिवावर गुन्हा, स्वतःच्या नातेवाईकांची नियुक्ती करीत शासनाकडून लाटले ६९.५० लाखांचे वेतन अनुदान

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील चोरटी (वायगाव) येथील छत्रपती शाहू महाराज माध्यमिक शाळेत तब्बल ८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस नियुक्त्या झाल्याचा धक्कादायक प्रकार पोलिस चौकशीत उघड झाला आहे. याप्रकरणी संस्थेचे तत्कालीन सचिव संतोष काशिनाथ रामटेके यांच्याविरुद्ध ब्रह्मपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

### संस्थेचा निधीही गायब!

**सन १९९८-९९ ते २०१७-१८ दरम्यान संस्थेला विविध स्रोतांकडून सुमारे १.५ कोटींचा निधी प्राप्त झाला होता. मात्र, हा निधी संस्थेच्या बँक खात्यात जमा न करता त्याचाही अपहार झाल्याचे संस्थाध्यक्ष डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी तक्रारीत सांगितले. या आर्थिक गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशीही सुरू आहे.**

संस्थेचे सचिव संतोष रामटेके यांनी २००९ मध्ये आपल्या नातेवाईकांच्या मदतीने ८ बोगस भरत्या केल्या. त्यात त्यांनी स्वतःची मुलगी स्नेहल रामटेके हिला सहाय्यक शिक्षिका म्हणून आणि मुलगा सारीपुत्र रामटेके याला कनिष्ठ लिपिक म्हणून नेमणूक दिली. पात्रता नसूनही बनावट शैक्षणिक कागदपत्रांवर या नियुक्त्या मंजूर करून घेतल्या. २०१३ मध्ये तत्कालीन शिक्षणाधिकारी रविकांत देशपांडे यांच्या सहकार्याने या बोगस नियुक्त्यांना मान्यता मिळवली गेल्याचेही चौकशीत समोर आले. वेतन अधीक्षक व शिक्षण उपसंचालकांनी मिळून या कर्मचाऱ्यांची बोगस शालार्थ आयडी तयार केली.

शाळेची बिंदुनामावली प्रमाणित करताना २०१२ मध्ये सर्व पदे रिक्त असल्याचे दाखवण्यात आले होते. पण चौकशीत २००९ मध्ये नियुक्त्या झाल्याचे स्पष्ट झाले. इतकेच नव्हे तर २०१० मध्ये स्कूल ट्रिब्युनल 'कडे कुठलीही नियुक्ती केली नाही, असे खोटे प्रतिज्ञापत्र सचिवांनी दिले होते.

यासंदर्भात संस्थाध्यक्ष डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर चौकशीसाठी एक विशेष पोलिस पथक गठित करण्यात आले. चौकशीअंती १३ नोव्हेंबर २०२५ रोजी संतोष रामटेके यांच्यावर गुन्हा दाखल झाला. आर्थिक गुन्ह्याचा तपास पुढे आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे, अशी माहिती ठाणेदार प्रमोद बानबले यांनी दिली.

# शिवसेना (उबाठा) च्या ब्रम्हपुरी तालुका नियुक्त्या जाहीर

ब्रह्मपुरी/का.प्र.

शिवसेना उबाठा पक्षाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने पक्षाचे चंद्रपूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रशांत कदम यांच्या सुचनेनुसार व भाष्कर ताजने चंद्रपूर जिल्हाप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ब्रम्हपुरी तालुक्यातील उपतालुका प्रमुख व विभागप्रमुख यांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. सदर नियुक्त्या शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा. अमृत नखाते, विधानसभा प्रमुख डॉ. रामेश्वर राखडे, प्रभारी तालुका प्रमुख तथा तालुका संघटक प्रा. ज्ञानेश्वर बगमारे, तालुका समन्वयक शामराव भानारकर यांच्या उपस्थितीत करण्यात आल्या.

यात सुमंत वैरागडे उपतालुका प्रमुख अऱ्हेरनवरगांव-नान्होरी जि.प. क्षेत्र, लिलानंद दाजीबा ढोरे विभागप्रमुख, राजेश दुपारे उपतालुकाप्रमुख पिंपळगांव-मालडोंगरी जि.प.क्षेत्र, चक्रधर दानी विभागप्रमुख, गणेश गुलाब बागडे खेडमक्ता-चौगान जि.प.क्षेत्र, किशोर टेकाम विभागप्रमुख, धनपाल मोतीराम विधाते मेंडकी-गांगलवाडी जि.प.क्षेत्र, हार्दिक आंबोरकर विभाग प्रमुख, किरण यशवंत राऊत हळदा-आवळगांव जि.प.क्षेत्र, इंजि. विक्की समर्थ निवासी उपतालुका प्रमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**मतदान करा...**
**लोकशाहीला बळकट करा...**

# भगवान श्री सत्यसाईबाबा यांचा १०० वा जन्मोत्सव साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २३नोव्हेंबर, रोज रविवारला श्री सत्यसाई सेवा संघटना ब्रम्हपुरी तर्फे भगवान श्री सत्यसाई बाबा यांचा १०० वा जन्मशताब्दी कार्यक्रम श्री लक्ष्मीनारायण मंदिर ब्रम्हपुरी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याकरिता ब्रम्हपुरी तालुका परिसरातील महिला व पुरूष साईभक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

याप्रसंगी ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी व सत्य साईसेवा संघटना ब्रम्हपुरी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या वैद्यकीय सेवांचा लाभ साईभक्तांनी घेतला. याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. देविरासजी जगनाडे, प्रमुख प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. नामदेवजी कोकोडे, विशेष अतिथी हरिश्चंद्रजी चोले यांनी भगवान सत्यसाई बाबांच्या जीवनावर आपल्या मार्गदर्शनातून प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे संचालन समिती प्रमुख तुळशीरामजी सपाटे यांनी आभार प्रदर्शन सुखदेव प्रधान यांनी केले.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात एनसीसी दिवस साजरा




ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयामध्ये ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी नागपूरच्या पत्रानुसार एनसीसी विभागातर्फे महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सैनिक दिवस साजरा दिवस आला. त्या अनुषंगाने महाविद्यालयात एनसीसी युनिट च्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिटच्या वतीने राष्ट्रीय छात्र सैनिक दिवस २३ नोव्हेंबर ला साजरा करण्यात आला. सर्वप्रथम एनसीसी युनिट च्या छात्रांना शपथ देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विविध उपक्रमामध्ये एनसीसीच्या इतिहासा वर आधारित निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा त्याचबरोबर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या स्पर्धेकरिता ब्रह्मपुरी पब्लिक स्कूलच्या प्राचार्य रिमा कांबळे, उपप्राचार्य अमल मेश्राम यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली. तर परिसरात वृक्षारोपण करते वेळेस संस्थेचे सदस्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. स्निग्धा कांबळे तर मराठी विभागाचे प्रा. वैभव गोसावी तसेच एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्राध्यापक सरोज शिंगाडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला.

सादर उपक्रमा महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संस्थेचे सचिव डॉक्टर देवेश कांबळे यांच्या मार्गदर्शना खाली यशस्वीरित्या उपक्रम राबविण्यात आले. प्रसंगी समाज जागृती पर रॅलीचे आयोजन करण्यात आले सदर रॅली महाविद्यालयातील निघून पोलीस वसाहत,शारदा कॉलनी, गांधीनगर, ग्रामीण रुग्णालय परिसर, तसेच शहराच्या मुख्य रस्त्याने जनजागृती पर रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये देशाभिमान जागृत करणाऱ्या व राष्ट्रीय सैन्य तुकडी असलेल्या राष्ट्रीय छात्र सैनिक दिनाच्या निमित्ताने भारत माता की जय राष्ट्रीय कॅडेट कोर्स जिंदाबाद अशा घोषणा देत रॅली काढण्यात आली. एनसीसी दिनानिमित्त विविध उपक्रम एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्राध्यापक सर्व शिंगाडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले यावेळेस ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिटच्या ५० छात्रा उपस्थित होत्या.

या उपक्रमामध्ये छात्र सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. त्यानंतर छात्र सैनिकांनी राष्ट्रीय कॅडेट स्कोर ची माहिती समाजातील विविध घटकापर्यंत पोहोचावी या हेतूने समाज जागृती पर रॅलीचे आयोजन करण्यात आले सदर रॅली महाविद्यालयातील निघून पोलीस वसाहत,शारदा कॉलनी, गांधीनगर, ग्रामीण रुग्णालय परिसर, तसेच शहराच्या मुख्य रस्त्याने जनजागृती पर रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये देशाभिमान जागृत करणाऱ्या व राष्ट्रीय सैन्य तुकडी असलेल्या राष्ट्रीय छात्र सैनिक दिनाच्या निमित्ताने भारत माता की जय राष्ट्रीय कॅडेट कोर्स जिंदाबाद अशा घोषणा देत रॅली काढण्यात आली. एनसीसी दिनानिमित्त विविध उपक्रम एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्राध्यापक सर्व शिंगाडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले यावेळेस ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिटच्या ५० छात्रा उपस्थित होत्या.

# अखेर.. स्टेट बँकेने शेतकऱ्यांचे लॉक केलेले खाते केले पूर्ववत सुरू

## शेतकऱ्यांचे बँक खाते पूर्ववत करण्यास विनोद झोडगे यांनी दिला होता आंदोलनाचा इशारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

मागील आठवड्यात विनोद झोडगे यांनी यांनी स्टेट बँकेला घेराव घालून शेतकऱ्यांची लॉक असलेले खाते त्वरित सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा या थेट इशारा दिला होता. त्यामुळे त्यांच्या मागणीची वरिष्ठ पातळीवर दखल घेण्यात आली असून मुडझा स्टेट बँकेमध्ये असलेल्या शेतकऱ्यांचे सर्व खाते आता पूर्ववत सुरू करण्यात आल्याने विनोद झोडगे यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना तसेच सामान्य नागरिकांना आर्थिक व्यवहार करणे सुलभ व्हावे, नागरिकांना शहराकडे न जाता व्यवहारासाठी सोईचे व्हावे यासाठी मुडझा येथे भारतीय स्टेट बँक सुरू करण्यात आली. या शाखेत परिसरातील अनेक शेतकरी, व्यापारी व सामान्य नागरिक आर्थिक व्यवहार करतात. शेतकरी धान पीक व अन्य पिकांकरिता याच बँकेतून कर्ज घेत असतात. मात्र निसर्गाच्या प्रकोपाने शेतकऱ्यांना दिलासादायक पीक हाती येत नाही. शासन धानाला भाव देत नाही याचा फायदा घेऊन व्यापारी शेतकऱ्यांची लूट करीत असतात. प्रसंगी शेतकऱ्यांचे बँकेचे कर्ज थकीत राहते. याच बँकेत श्रावणबाळ योजना, किसान सन्मान निधी, अवकाळी पाऊस निधी, रोजगार हमी निधी, घरकुल निधी, धान बोनस निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात. मात्र बँकेच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांवर कर्ज असल्याने त्याचे सेव्हिंग खाते सील केले. त्यामुळे शेतकऱ्यांना व्यवहार करता येत नव्हते. शासकीय नियमानुसार, शेतकऱ्यांना मिळत असलेल्या इतर निधीतून त्यांचे पीक कर्जात रूपांत करू नये. त्यांच्या निधीतून रक्कम कपात करू नये, असे असताना देखील बँकेकडून शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून मनमानी कारभार सुरू होता. बँक कर्मचारी शेतकऱ्यांना सौजन्याची वागणूक देत नव्हते.

शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याची माहिती मिळताच शेतकरी नेते कॉम्रेड विनोद झोडगे यांनी त्यांच्यावर झालेल्या न्यायाला वाचा फोडण्यासाठी भारतीय स्टेट बँकेलाच घेराव घातला व सबंधित अधिकाऱ्यांशी होत असलेल्या अन्यायाबाबत चर्चा करून मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी बँक शाखा अधिकारी यांनी येत्या हप्ता भरात बँक खाते सुरू करण्याचे आश्वासन दिले होते.

त्यानंतर वरिष्ठांनी दखल घेऊन बँकेमध्ये शेतकऱ्यांचे सील असलेले खाते पुन्हा सुरू केले. त्याबद्दल बँकेत खाते असलेल्या शेतकऱ्यांनी विनोद झोडगे यांचे आभार मानले आहेत.

## एलएमबी पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथे

# Techno Awareness कार्यशाळेचे आयोजन



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोज शनिवारला एल. एम. बी. पब्लिक स्कुल मध्ये वर्ग केजी-१ ते ३ री पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी Techno Awareness या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

electronics gadgets उदा. मोबाईल, टीवी, कम्पुटर याच्या अनावश्यक वापर करण्यामुळे लहान मुलांवर याचे अनेक दुष्परिणाम होतात. मुलांमध्ये या दुष्परिणामाविषयी जागृता निर्माण व्हावी याकरिता Techno Awareness या वर्कशॉप च्या माध्यमातून मुलांना जागरूक करण्यात आले. या करिता प्रि-स्कूल विभागातील सर्व शिक्षिकांनी एक छोटी नाटिका विद्यार्थ्यां समोर सादर केली. ज्यामध्ये शाळेत शिकणारी एक विद्यार्थ्यांनी घरी सतत आपल्या आईवडिलांचा मोबाईल बघते व काही महिन्यानंतर तिच्या या सवयीमुळे तीच्या डोळ्यांवर वाईट परिणाम होऊन ती तीची दृष्टी गमावते व त्यापासुन ती एकच धडा शिकते की, मी आजपासुन मोबाईल बघणार नाही. मुलांमध्ये हीच सृजनता यावी म्हणून सर्व प्रि-स्कुल च्या शिक्षिकांनी उत्कृष्टरित्या ही नाटिका सादर केली.

या वेळी शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, तसेच शाळेच्या उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होते. नाटिका सादर झाल्यानंतर सर्व मुलांशी संचालिका मॅडम यांनी सुसंवाद साधत मुलांना आपल्या शब्दामध्ये परत एकदा Techno Awareness विषयी जागरूक केले. सर्व शिक्षिकांच्या सहयोगाने हे वर्कशॉप यशस्वीरित्या पार पडले.

# मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी रांगोळीतून रूजविले मतदानाचे रंग

ब्रम्हपुरी/का.प्र.

लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नेवजाबाई



हितकारिणी कन्या विद्यालयात मतदान जनजागृतीवर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणारे आकर्षक आणि संदेशप्रधान चित्ररूप सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

स्पर्धेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'मतदान हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. भावी पिढीला यातून लोकशाहीचे मूल्य समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे.' भविष्यात जबाबदार नागरिक तयार होण्यासाठी विद्यार्थ्यांनी लहानपणापासून लोकशाहीचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे.'

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'मतदान करूया – देश घडवूया', 'प्रत्येक मत महत्त्वाचे', 'माझे मत – माझा हक्क' तसेच 'लोकशाहीची ताकद' असे प्रभावी संदेश रांगोळ्यांद्वारे मांडले. विविध रंगसंगती, कल्पकता आणि सामाजिक भान यांचा सुंदर संगम स्पर्धेत दिसून आला.

सादर कार्यक्रम निवडणुक निर्णय अधिकारी सतिश मासाळ व सहा. निवडणुक निर्णय अधिकारी डॉ माधुरी सलामे व अतिरिक्त निवडणुक निर्णय अधिकारी लिना बोबाटे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# बचत गटातील महिलांना दिली मतदानाची शपथ

ब्रम्हपुरी/का.प्र.



नगर परिषद ब्रम्हपुरी सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात बचत गटातील महिलांना 'मी मतदान करणारच' ही शपथ देण्यात आली.

लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क नक्की बजावावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात अधिकारी व मार्गदर्शकांनी महिलांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगत, निर्भयपणे, कोणत्याही प्रलोभनाशिवाय आणि जबाबदारीने मतदान करण्याचे आवाहन केले. त्यानंतर सर्व महिलांनी एकमुखाने मतदानाची शपथ घेतली. मत हा आपला अधिकार असून तो जबाबदारीने बजावला पाहिजे, असा संदेश देण्यात आला. सदर कार्यक्रम निवडणुक निर्णय अधिकारी मासाळ साहेब व सहा. निवडणुक निर्णय अधिकारी डॉ माधुरी सलामे व अतिरिक्त निवडणुक निर्णय अधिकारी लिना बोबाटे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

# इन्स्पायर करिअर अकॅडमी, ब्रम्हपुरीच्या ०३ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड

ब्रह्मपुरी/का.प्र.

संपूर्ण विदर्भात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या इन्स्पायर करिअर अकॅडमी,



ब्रह्मपुरी या संस्थेने पुन्हा एकदा यशाचा नवा इतिहास रचला आहे. संस्थेतील तीन विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड होऊन संस्थेचा गौरव अधिक वृद्धिंगत झाला आहे. यामध्ये प्रियंका सुरपाम हिची औरंगाबाद पोलिस विभागात निवड झाली असून, मंगला गुरनुले व प्राची नागपुरे यांची महाराष्ट्र सुरक्षा दल (MSF) मध्ये निवड झालेली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन आणि योग्य दिशादर्शन करून यशाकडे घेऊन जाण्याचे काम इन्स्पायर अकॅडमी सातत्याने करत असल्याचा हा आणखी एक पुरावा ठरला आहे.

इन्स्पायर करिअर अकॅडमी ही ब्रह्मपुरीतील सर्वाधिक रिझल्ट देणारी अग्रगण्य संस्था म्हणून परिचित आहे. आजपर्यंत या संस्थेमधून मोठ्या संख्येने विद्यार्थी विविध शासकीय सेवांमध्ये रुजू झालेले आहेत. या संस्थेतून PSI, STI, ASO यांसह अनेक प्रशासकीय अधिकारी तयार झाले असून, अनेक विद्यार्थी पोलीस दलात, सुरक्षा दलात तसेच इतर विविध शासकीय विभागात यशस्वीरीत्या कार्यरत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची जाणीव करून देणे, योग्य अध्ययन पद्धतीची ओळख करून देणे आणि त्यांच्या मनामध्ये स्पर्धेची आवड निर्माण करणे या ध्येयाने ही संस्था अविरत कार्यरत आहे. कठोर परिश्रम, उत्कृष्ट अध्यापन आणि परिणामकारक मार्गदर्शन यामुळे इन्स्पायर करिअर अकॅडमीने आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या संचालिका एकता गुप्ता, मार्गदर्शक प्रा. देवानंद सर, प्रणय पीठाले, शितल भाजीपाले, प्रवीण प्रधान, विवेक खरवडे, भागडकर सर, दीपक सेमस्कर सर, मनोहर आंबोरकर सर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी–आरमोरी राष्ट्रीय महामार्ग (NH-353D) वरील बेटाळा फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात चौगान येथील रहिवासी पांडुरंग सदाशिव मातेरे (वय ६५) यांचा जागीच मृत्यू झाला. सदर घटना मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबरला सकाळी १०.४५ वाजता सुमारास उघडकीस आली

प्राप्त माहितीनुसार, पांडुरंग मातेरे हे सकाळी किन्ही येथील मिनी बँकेत पैसे काढण्यासाठी गेले होते. काम आटोपून सायकलवरून सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास गावी परत जात असताना आरमोरीकडून ब्रम्हपुरीकडे येणाऱ्या भरधाव टेम्पोने त्यांना मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांचा जागीच मृत्यू झाला. धडक दिल्यानंतर टेम्पोचालक वाहनासह परत फिरत आरमोरीच्या दिशेने पसार झाला. अपघातग्रस्त वाहनाची ओळख अद्याप पटलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपुरी पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ब्रम्हपुरी ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बालाजी चव्हाण करीत आहेत.

# चौगान येथील ‘शक्ती-भक्ती स्मारक’ सुशोभीकरण कामाचे भूमीपूजन, आमदार निधीतून ३ लाखांची मदत



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील चौगान या सर्वात शिक्षित व ‘सैनिकांचे गाव’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यपरंपरेला आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या भक्तिपरंपरेला सन्मान देणारे ‘शक्ती-भक्ती स्मारक’ चौगान येथे उभारण्यात आले असून स्मारकाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या स्मारकाचे सुशोभीकरण करण्यासाठी ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार व माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी आपल्या विकास निधीतून रु. ३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर सुशोभीकरणाच्या कामाच्या भूमिपूजनाचा सोहळा दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांच्या शुभहस्ते पार पडला.

स्मारकाच्या निर्मितीपासून ते सुशोभीकरणापर्यंत आमदार विजय वडेट्टीवार यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभले आहे. स्मारकाच्या सौंदर्यवृद्धीसाठी निधीची आवश्यकता असल्याचे शक्ती-भक्ती स्मारक समितीच्या वतीने तालुकाध्यक्ष खेमराज तिडके यांना कळविण्यात आले होते. त्यांनी तत्काळ पुढाकार घेत आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्याकडे मागणी सादर केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आम. वडेट्टीवार यांनी रु. ३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या सहकार्याबद्दल शक्ती-भक्ती स्मारक समिती, शिवप्रेमी व ग्रामस्थांनी आमदार वडेट्टीवार यांचे मन:पूर्वक आभार मानले.

या भूमिपूजन सोहळ्यावेळी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. राजेश कांबळे, माजी पोलिस पाटील किशोर तिडके, प्रा. डी.के. मेश्राम, स्मारक समितीचे सल्लागार धनराज बुराडे, अमित कन्नाके, ब्रम्हपुरी कृउबास संचालक दिवाकर मातेरे, किशोर राऊत, अनिल पिलारे, सदस्य श्रीहरी बुराडे, स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पिलारे, सचिव हिवराज आठोळे, सदस्य भगवान प्रधान, उमेश भुरके, सचिन राऊत, सुरज देव्हारी, गौरव गुणशेट्टवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरची विद्युत खांबाला धडक

### रात्रभर पेठ वार्डातील विद्युत पुरवठा खंडीत

ब्रह्मपुरी/का.प्र.

सध्या मोठ्या प्रमाणात ब्रह्मपुरी शहरात अवैद्य रेती वाहतुकीची सुळसुळाट सुरू आहे. नदीपात्रातून अवैद्य रेती उत्खनन करून मध्यरात्री रेती शहरातील विविध वार्डामध्ये जास्त दराने विक्री केली जात आहे. मात्र, प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

रविवार, २३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री एका अज्ञात ट्रॅक्टरने भगतसिंग चौकापासून पेठवार्ड रेल्वे फाटकेकडे जाणाऱ्या मार्गावर तोंडरे यांच्या घराजवळील उभ्या विद्युत खांबाला जोरदार धडक दिल्याने सिमेंटचा खांब पूर्णतः तुटला. यामुळे पेठ वार्डातील वीज पुरवठा रात्रभर बंद होता. परिणामी, नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

**... QUOTES ...**

**“Success is the ability to go from one failure to another with no less enthusiasm.”**

**- Winston Churchill**

## बहुआयामी व्यक्तिमत्त्व ॲड...

(पान क्र. १ वरून)

समाजाची मोट बांधण्याचे काम त्यांनी केले. गोसेखुर्द पाण्याचा प्रश्न, वेगळ्या विदर्भाचे आंदोलन, ओबीसी आंदोलनाचा लढा, ब्रह्मपुरी जिल्हा झालाच पाहिजे आदी अनेक आंदोलनात त्यांनी हिरिरीने सहभाग घेतले. कायदेविषयक जाण, संयमी स्वभाव आणि धडाडीची कार्यशैली यामुळे गोविंदराव कार्यकर्त्यांपासून ते विविध सामाजिक स्तरात अत्यंत लोकप्रिय होते. गेल्या काही वर्षांपासून ते ब्रह्मपुरी येथे वास्तव्य करत होते.

स्थानिक प्रश्न, शेतकरी-धरणग्रस्तांचे हक्क, सामाजिक न्याय आणि प्रगतिशील मूल्यांसाठी ते आयुष्यभर झटत राहिले. सामाजिक चळवळींना दिशा देणारे, वैचारिक रेखाटन दृढ करणारे आणि संघर्षमय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करणारे ॲड. भेंडारकर यांच्या निधनाने नागभीड-ब्रम्हपुरी परिसरासह चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रगतिशील क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्यावर काल, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ ला दुपारी वैकुंठ स्मशानभूमी भूतीनाला ब्रम्हपुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

**चारोळी**

प्राजक्ताप्रमाणे तुझे नित्य उमलणे, बहरणे
निर्माल्य झाले तरी दरवळत राहणे...
त्यापेक्षा तू रूईचे फूल हो, हनुमानाप्रमाणे
शनिवारी मलाही भेटत राहणे...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांची विविध स्पर्धांमध्ये यशस्वी कामगिरी

## चित्रकला, निबंध, गायन व पोस्टर स्पर्धेत विद्यार्थी चमकले





ब्रम्हपुरी/का.प्र.

'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून ब्रम्हपुरी येथे दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी आयटीआय कॉलेज येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्य 'भारत मातेच्या स्तुतीचा गौरव दिवस' या कार्यक्रमा अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्व यशवंत बाजारे शासकिय औद्यागिक प्रशिक्षण संस्था ब्रम्हपुरी हे या स्पर्धेचे आयोजक होते. यामध्ये वर्ग ५ वी ते ७ वी तसेच वर्ग ८ वी ते १० या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे चित्रकला, गायन, निबंध, पोस्टर मेकिंग अशा विविध स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपला सहभाग नोंदविला व यश प्राप्त केले. वर्ग ५ वी ते ७ वी या गटातील चित्रकला या स्पर्धेमध्ये वर्ग ६ वी च्या कु. सौम्या भानारकर हिने प्रथम व वर्ग ७ वी च्या कु. श्रीमही निकुरे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच याच गटातील गायन स्पर्धेमध्ये वर्ग ५ वी च्या कु. राशी राऊत हिने द्वितीय क्रमांक मिळवून यश प्राप्त केले. दुसरा गट वर्ग ८ वी ते १० ह्या विद्यार्थ्यांसाठी होता, त्या गटामधील निबंध स्पर्धेमध्ये वर्ग ९ वी ची विद्यार्थीनी कु. मृण्मयी राऊत हिने द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच चित्रकला या स्पर्धेमध्ये वर्ग ९ वी ची विद्यार्थीनी कु. जोशा भरें हिने प्रथम व वर्ग ८ वी ची विद्यार्थ्यांनी कु. आस्था धाईत हिने गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. पोस्टर मेकींग स्पर्धेमध्ये वर्ग ८ वी ची विद्यार्थ्यांनी कु. टिया रहांगडले हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम व समस्त शिक्षक शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

**जल है तो कल है...**

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



## ३३,७७९ मतदार निवडणार नगराध्यक्ष...

(पान क्र. १ वरून)

०४ तर नगरसेवक पदासाठी ९५ उमेदवार रिंगणात आहेत. ब्रम्हपुरी नगर पालिकेची निवडणूक चुरशीची ठरणार आहे. नगर पालिका निवडणूकीत उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात आले असून, उमेदवारांनी आपल्या प्रचाराच्या तोफा आपआपल्या प्रभागात डागल्या आहेत. यात नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत काँग्रेस व भाजपा पक्षाने प्रचाराचा वेग वाढविला आहे. तर तिसऱ्या आघाडीने प्रस्थापितांविरूद्ध दंड थोपाटले असले तरी, प्रचारात तिसरी आघाडी मात्र, पाहिजे त्या प्रमाणात आघाडी घेतल्याचे दिसत नाही. यावरून नगराध्यक्ष पदाची थेट लढत काँग्रेसचे योगेश मिसार यांच्या विरूद्ध भाजपाचे सुयोग बाळबुद्धे यांच्यात असल्याची चर्चा आहे.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व भावी नगरसेवक आपआपल्या प्रभागात नागरिकांच्या घरोघरी भेटी घेत असून आम्हीच नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी सक्षम असल्याचे सांगत आहेत. काही नगरसेवकांकडून प्रलोभन म्हणून नागरीकांना धाब्यावर, लॉजवर दारू व जेवणाच्या पार्ट्याचे आयोजन सुरू असल्याचे कळते. एकंदरीत ब्रम्हपुरीच्या नगर पालिका निवडणूकीत राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

**एक सुजान नागरिक म्हणून मतदान अवश्य करा..**

## साहेब, दोन वेळच्या अन्नाचे लाले पडताहेत...

(पान क्र. १ वरून)

उच्चशिक्षित असून कामाच्या शोधात आहेत. तर मुलगा लहान असून तो वडील मोहम्मद यांना दुकानाच्या कामात मदत करतो. मोहम्मद शेख यांना स्वत:चे घर नसून, ते किरायच्या घरात राहतात. ना शेती, ना वाडी. केवळ, धंद्याच्या भारोश्यावर संपूर्ण कुटुंबाचा गुजारा आहे. ते सांगतात की, 'गेल्या चार महिन्यांपासून रस्त्याचे काम चालू आहे. काम सुरू असल्यामुळे रस्त्यावरची धूळ सतत दुकानातील मालावर साचत असते. रोज दिवसभर मालावरची धूळ साफ करावी लागते. रस्त्याचा काम सुरू असल्यामुळे ग्राहक संख्या रोडावली आहे. कधी धंदा होते, तर कधी काहीच धंदा होत नाही. धंद्याच्या भारोश्यावर घर चालते. पैसे आल्यावरच घरात चूल पेटते, अन्यथा आसवांचा हुंदका गिळूनच झोपावे लागते. साहेब, दोन वेळच्या खायचे लाले पडताहेत हो. आता तुम्हीचं सांगा, आम्ही जगायचं कसं? एके काळी याच महामार्गावरील फुटपाथ दुकानातून आम्हाला चांगले उत्पन्न मिळून आमचे कुटुंब आनंदात असे. मात्र, सध्या सुरू असलेल्या रस्त्याच्या विकास कामातून निर्माण झालेल्या समस्येमुळे कुटुंबावर अत्यंत हलाखीची परिस्थिती निर्माण झाली आहे', असं पाणावलेल्या डोळ्यांनी मोहम्मद शेखने आपली करुण कहाणी सांगितली.

भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी मोहम्मद शेख यांना इकडे तिकडे धडपड करावी लागत आहे. शिवाय धंद्यासाठी घेतलेले कर्ज त्यांच्या माथी बसूनच आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याच्या कामामुळे फुटपाथची व धुळीची समस्या उद्भवली असून, त्यामुळे ग्राहक संख्या मंदावली आहे. परिणामी, राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज कुठून फेडणार? पोटाची खळगी कशी भरणार? मुलीचे लग्न? असे एक नव्हे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर आ वासून उभे आहेत. या उद्भवलेल्या समस्येमुळे मोहम्मद यांच्या समोर जगावं की मरावं, असा प्रश्न निर्माण झाला आहे. व्यवसाय करून स्वाभिमानाने जगणाऱ्या मोहम्मद शेख यांना समाजाच्या आधाराची नितांत गरज आहे. तरचं ते या परिस्थितीतून बाहेर पडू शकतील, अन्यथा चुकीचं पाऊल उचलण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे अनेक मोहम्मद ब्रम्हपुरीतील महामार्गाच्या संथ कामामुळे विवंचनेत आहेत.

ब्रह्मपुरी तालुक्यातील राजकारणी, प्रतिष्ठित नागरिक, समाजसेवी संस्था, दानशूर व्यक्तींनी फूटपाथवर जीवन जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या मोहम्मद शेख यांच्यासारख्यांचा विचार करून महामार्गाचे काम जलद गतीने होण्यासाठी प्रयत्न करावे तसेच त्यांना मदतीचा हात दिल्यास, त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाल्याशिवाय राहणार नाही. हे मात्र खरे आहे.



Lubi PUMPS·MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404